# दाभोलकर-पानसरे हत्या : तपासातील रहस्ये ?





## अमित थढ़ानी

# दाभोलकर-पानसरे हत्या : तपासातील रहस्ये ?

महाराष्ट्रातील चर्चेचा विषय बनलेल्या डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्यांच्या संबंधी वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित माहिती, आरोपपत्रे आणि न्यायालयाचे आदेश यांचे हे पुस्तक एक विस्तृत संशोधन आहे. या प्रकरणात दोन पक्ष आहेत. एक हत्या झालेल्या नास्तिकतावाद्यांचा आणि दुसरा हत्येचा आरोप झालेल्या संस्थांच्या सदस्यांचा. प्रस्तुत लेखकाने कोणत्याही पक्षाच्या बाजूने लेखन न करता संपूर्ण तपासाचे तटस्थ सत्यशोधन केले आहे. उभय प्रकरणातील तपास यंत्रणांचे पूर्ण अपयश आणि पोलिसांच्या तपासावरील राजकीय प्रभाव यांवर हे पुस्तक भाष्य करते.

खरे आरोपी न पकडले गेल्यास सीबीआय सारखी सर्वोच्च तपाससंस्थाही कशा प्रकारे अन्यायकारक कृत्ये करते, हे पुस्तकातील उदाहरणांवरुन लक्षात येते. या पुस्तकात लेखकाने भारतासारख्या लोकशाही राष्ट्रात दोषींना शिक्षा देण्यासाठी आणि निरपराधांना संरक्षण देण्यासाठी दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या पोलीस दले आणि न्यायिक प्रक्रिया यांच्यात सुधारणा तातडीने व्हावी, यासाठी पाठपुरावा केला आहे.

## अमित थढ़ानी



डॉ. अमित थढ़ानी हे दोन दशकांहून अधिक काळ मुंबई आणि नवी मुंबई येथे प्रॅक्टिस करणारे प्रसिद्ध जनरल सर्जन आहेत. ते 'इंडियन मेडिकल असोसिएशन'च्या चेंबूर शाखेचे माजी अध्यक्ष आहेत आणि अनेक डॉक्टरांच्या संस्थांचे प्रमुख सदस्य आहेत. ते एक सामाजिक कार्यकर्ते असून त्यांची सामाजिक संस्था प्रतिवर्षी अनुमाने 300 मुलांच्या शिक्षणासाठी साहाय्य करते. त्यांनी भारत आणि नेपाळ येथील अनेक आपत्तीग्रस्त भागात 10,000 रुग्णांवर मोफत उपचार केले आहेत. ते 'ऑल-डॉक्टर म्युझिकल बँड'मध्ये गिटार वाजवतात आणि मोकळ्या वेळेत सेंद्रिय शेती करतात.